# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२० दि. १८ सप्टेंबर, २०२०

जळगाव दि. १८ (प्रतिनिधी): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या (बॅकलॉगसह) विद्यार्थ्यांच्या परीक्षा आयोजनाच्या तयारीचा आढावा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी घेतला व परीक्षेच्या पूर्वतयारी बद्दल समाधान व्यक्त केले.

शुक्रवारी दुपारी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहात आढावा बैठक श्री. सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली. यावेळी पालकमंत्री गुलाबराव पाटील, कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांची मुख्य उपस्थिती होती.

परीक्षेच्या आयोजनाची सुरू असलेली तयारी उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी जाणून घेतली. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील यांनी या परीक्षेसाठी ५३ हजार ५६४ परीक्षार्थी राहणार असून ३१ ऑक्टोबर पर्यंत लेखी परीक्षा पूर्ण होतील अशी माहिती दिली. परीक्षेसाठी २७२ दिव्यांग विद्यार्थी बसले आहेत. या परीक्षांसाठी ऑनलाईन हा पर्याय बहूसंख्य विद्यार्थ्यांनी निवडला असून सराव परीक्षांचे आयोजन केले जाणार आहे. प्रश्नसंचाची मागणी प्राध्यापकांकडून करण्यात आली आहे. कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही अशी ग्वाही या बैठकीत विद्यापीठाच्यावतीने देण्यात आली. जे विद्यार्थी ही परीक्षा देऊ शकणार नाहीत त्यांच्यासाठी स्वतंत्र परीक्षेची एक संधी दिली जाईल असे सांगून विद्यापीठाने जे विद्यार्थी अनुत्तीर्ण होतील त्यांची नोव्हेंबरच्या आत पून्हा परीक्षा घेतली जाईल असे या बैठकीत जाहीर केले.

यावेळी बोलतांना श्री.उदय सामंत म्हणाले की, ऑफलाईन पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांना कोविडच्या पार्श्वभूमीवर कोणत्याही अडचणी येणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी. या विद्यापीठातील जवळपास ५ हजार विद्यार्थ्यांनी ऑफलाईनचा पर्याय निवडला आहे. त्यामुळे तीनही जिल्ह्यात परीक्षा केंद्रावर या विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे आणण्यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन, आरोग्य विभाग यांचे सहकार्य घेण्यात यावे. एस.टी. महामंडळाचा देखील सहभाग घेऊन विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर पोहचविण्याची व्यवस्था केली जावी. शक्य तेवढ्या जवळचे परीक्षा केंद्र विद्यार्थ्यांना दिले जावे. परीक्षा केंद्र सॅनेटाइज केले जावे. अशा सूचना श्री.सामंत यांनी केल्या. उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रावर कोविड बॅच असा कोणताही शिक्का असणार नाही. जाणीवपूर्वक कोणी तरी गैरसमज पसरवित आहेत. नियमित पदवी प्रमाणपत्र दिले जाईल. या उत्तीर्ण विद्यार्थ्यांना नौकरीसाठी अडवणूक केल्यास त्या उद्योगांविरूध्द कारवाई करण्याचा इशारा मुख्यमंत्र्यांनी दिलेले आहे असे सांगून कोणतेही मानसिक दडपण न घेता विद्यार्थ्यांनी परीक्षा द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

या बैठकीस प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहूलीकर, जिल्हाधिकारी अभिजित राऊत, अतिरिक्त पोलीस अधिक्षक भाग्यश्री नवटके, अधिष्ठाता प्रा.ए.बी.चौधरी, प्रभारी कुलसचिव प्रा.बी.व्ही.पवार, आमदार चंद्रकांत पाटील, सहसंचालक सतीष देशपांडे, तंत्र शिक्षण सहसंचालक डी.पी.नाथे आदी उपस्थित होते. प्रा.बी.व्ही.पवार यांनी बैठकीचे सुत्रसंचलन केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात संत साहित्याचा अभ्यास व्हावा यासाठी संत मुक्ताई अध्यासन केंद्र व संत वाङ्मय अध्यासन केंद स्थापन करण्यासाठी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी विद्यापीठामार्फत प्रस्ताव सादर केला आहे. बुधवारी मंत्रालयात होणाऱ्या बैठकीत यावर चर्चा होऊन मान्यता दिली जाईल. तसेच या दोन्ही केंद्रांसाठी व बहिणाबाई चौधरी अध्यासन केंद्रासाठी आवश्यक निधीची तरतूद केली जाईल अशी माहिती श्री.उदय सामंत यांनी बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

जळगाव

महोदय,

आपल्या लोकप्रिय दैनिकातून उपरोक्त बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी